# स्थायित्व प्रमाणपत्र मिळणे बाबत

| अ.क्र. | | छाननीचे मुद्दे |
|---|---|---|
| 1 | शासकिय कर्मचा-याला स्थायित्व लाभ प्रमाणपत्र देण्या करिता कोणत्या शर्ती लागू आहेत ? | (1) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 11 सप्टेंबर 2014 च्या शासन परिपत्रकांत विहित करण्यात आल्यानुसार, विशिष्ट पदावर 3 वर्षाची नियमित सेवा पुर्ण करणा-या व पुढील शर्तीची पुर्तता करीत असल्याने कायमपणाचे फायदे मिळण्यास पात्र होणा-या अस्थायी शासकिय कर्मचा-यास नियुक्ती प्राधिका-यांनी / त्यांनी प्रदान केलेल्या सक्षम प्राधिक-यांनी स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.<br>(अ) कर्मचा-यांची नियुक्ती सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने होणे<br>(ब) कर्मचारी सेवेस पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र असणे व कर्मचा-याने सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण होणे.<br>(क) कर्मचा-याचा सेवाभिलेख चांगला असणे.<br>(2) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि 11 सप्टेंबर 2014 अन्वये पात्र अस्थायी कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र वेळीच देण्याची आणि त्याची नोंद सेवापुस्तकांत घेण्याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. जेणे करुन कर्मचा-यास लाभ मंजुरी व निवृत्ती वेतन विषयक विलंब होणार नाही. |
| 2 | स्थायित्व प्रमाणपत्र दिले जाण्यापुर्वी कर्मचा-याची दुस-या कार्यालयात बदली झाल्यास, असे प्रमाणपत्र कोणत्या कार्यालयाने प्रदान करावे ? | शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक 11 सप्टेंबर 2014 नुसार संबधित कर्मचा-याला तो स्थायित्व प्रमाणपत्र मिळण्यास ज्या दिनांकापासुन पात्र ठरेल त्या दिनांकापासुन ते देणे आवश्यक आहे. तसेच असे प्रमाणपत्र देण्यापुर्वी जर कर्मचा-याची पदोन्नती, बदली अथवा अन्यत्र सामावुन घेण्याची कार्यवाही झाली असेल तर त्याच्या सध्याच्या कार्यालयाने तो त्यापुर्वी काम करीत असलेल्या कार्यालयाकडून शासन परिपत्रक दि 11 सप्टेंबर 2014 मधील अटींची पुर्तता संबधित कर्मचारी करीत होता किंवा कसे याबाबतची माहिती मिळवुन अशा कर्मचा-यास पुर्वीच्या पदाचे स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात यावे अशी तरतुद आहे. त्यानुसार कर्मचारी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाने कार्यवाही करावी. |